# कार्यावली

**सोमवार, दिनांक १४ मार्च, २०११ रोजी दुपारी १.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०११ च्या प्रथम अधिवेशनाची कार्यावली.**

**एक** : राज्यपालांचे अभिभाषण.
**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव
**तीन** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.
**चार** : प्रश्नोत्तरे
**पाच** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.
**सहा** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा
**सात** : सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प सादर करणे.
**आठ** : सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.
**नऊ** : सन २०१०-२०११ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.
**दहा** : सन २०१०-२०११ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.
**अकरा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.
**बारा** सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सादर करणे.
**तेरा** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.
**चौदा** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.
**पंधरा** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.
**सोळा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.
**सतरा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.
**अठरा** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.
**एकोणीस** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.
**वीस** : शासकीय विधेयक.
: विचार, खंडशः विचार व संमत करणे.
: सन २०१० चे वि.प.वि.क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१०
**एकवीस** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.
**बावीस** : शोक प्रस्ताव
**तेवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये
**चोवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये
**पंचवीस** : अशासकीय विधेयके
**सव्वीस** : अशासकीय ठराव (म.वि.प.नियम १०२ अन्वये)

श्री.संजय केळकर यांचा ठराव क्रमांक १,२,३

(१) '' शासनाने मागील अनेक वर्षापासून ठाणे शहराच्या जमिनीचा सर्व्हे न करणे, ठाणे शहरात बांधकामाची झालेली व होत असलेली प्रचंड वाढ, तथापि, अशाप्रकारे झालेल्या बांधकामाची जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद नसणे, त्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, गरजू नागरिकांना मागणी करुनही नोंदी उपलब्ध नसल्यामुळे मालमत्ता प्रमाणपत्र प्राप्त न होणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, ठाणे शहराला नोंद नसलेल्या बांधकामांपासून वाचविण्यासाठी व शासनाच्या महसूलात वाढ होण्यासाठी ठाणे शहरातील जमिनीचे सर्वेक्षण करण्याकरिता खास अभियान तातडीने राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) '' कोकण रेल्वे सुरु होऊन सुमारे १३ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही आजमितीस या मार्गावर एकमार्गी (Single Track) वाहतूक सुरु असणे, कोकणातील जनतेने आपली बहुमूल्य जमीन कोकण रेल्वेसाठी उपलब्ध करुन दिलेली असतानाही मोजक्याच रेल्वे गाड्या असल्याने या रेल्वेचा फायदा कोकणातील विशेषतः सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील जनतेला होत नाही. कोकण रेल्वे एकेरी मार्गाचे विस्तारीकरण करुन दुहेरी मार्ग सुरु करण्याच्या दृष्टीने, तसेच कोकणातील प्रवाशांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी आरक्षण वाढविणे, या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ या सुमारे ६०० कि.मी.लांबीच्या अंतरामध्ये असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, असलेले असंख्य चढउतार कालबाह्य झालेले असंख्य अरुंद, कमकुवत व मोडकळीस आलेले पूल, अनेक ठिकाणी रस्त्यांच्या बाजूने संरक्षक भिंत,कठडे नसणे, साईनबोर्डस्,साईडपट्टयाचा अभाव तसेच संपूर्ण महामार्गाची झालेली दुरावस्था, परिणामतः या महामार्गावर सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली मनुष्यहानी, तसेच,वित्त हानी, या सर्व बाबी विचारात घेता मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या महामार्गावर असलेली सर्व वेडीवाकडी वळणे, चढउतार तसेच अरुंद, कमकुवत, मोडकळीस आलेल्या व त्यामुळे कालबाह्य झालेल्या पुलांच्या पुर्नबांधणी इ. कामाबाबत एक कालबध्द योजना आखून त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा ठराव क्रमांक ७,८,९

(७) '' राज्यात वाढत चाललेल्या नक्षलवाद्यांच्या कारवाया, यामध्ये अनेक पोलिस कर्मचारी व लोकांचे गेलेले नाहक बळी, नक्षलवादी व पोलिस यांचेकडून आदिवासींची होणारी पिळवणूक विचारात घेवून नक्षलवाद्यांच्या अत्याचारांना प्रतिबंध घालून आदिवासी जनतेला दिलासा मिळावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे वाढत असलेले प्रमाण, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे देखील वाढत चाललेले प्रमाण, परिणामी महिलांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पोलीस यंत्रणाही असे गुन्हे रोखण्यात अपयशी ठरणे, याबाबी विचारात घेवून महिलांवर व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांना आळा बसावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९) '' राज्यातील आवश्यक असलेल्या अर्ध्याहून अधिक कृषी पंपाचे वीज कनेक्शन दिले न गेल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित राहून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे, ट्रान्सफॉर्मर उपलब्ध असूनही कनेक्शन न देण्याचे घडत असलेले प्रकार या बाबी विचारात घेवून खरीब व रब्बी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना कनेक्शन देण्याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री.अनिल भोसले यांचा ठराव क्रमांक ११,१२,१४,१५

(११) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

डॉ.निलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक १८,१९

(१८) '' राज्यात स्टोव्हच्या भडक्याने वा दिव्याने पेट घेणे, या कारणाने होणारे मृत्यू अपघाती म्हणून नोंदविले जातात, हे मृत्यू अनेकदा मोठया प्रमाणात तणाव व घातपातातून घडलेले असतात, म्हणून अशा जळीत घटनांपैकी प्रत्येक घटनेची सखोल चौकशी संवेदनशील पद्धतीने होवून त्याबाबतचा तपशीलवार अहवाल त्या - त्या जिल्हयातील शहरातील गुन्हा अन्वेषण विभागाकडे सोपविणे आवश्यक आहे, अशा प्रकरणातील पिडीत जळीत स्त्रियांच्या न्यायासाठी अत्याचार विरोधी समिती शासनाने स्थापन करुन अपघात प्रतिबंधक योजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१९) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद असणे, तसेच वाहतुक सिग्नल यंत्रणा योग्य नसणे,राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसणे,परिणामी राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, माहे सप्टेंबर,२०१० मध्ये लोकप्रिय कलावंत तसेच राज्याचे एका मंत्रीमहोदयांच्या गाडीला झालेला अपघात, तसेच गोंदिया जिल्हयातही झालेल्या भिषण अपघातात एकाच वेळी १७ जणांचा झालेला मृत्यू, अशा प्रकारे सातत्याने होणाऱ्या रस्त्यावरील अपघातांमुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने उपाय योजना सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

डॉ.दिपक सावंत यांचा ठराव क्रमांक २१,२२,२५

(२१) '' राज्यात रस्ते अपघतात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच व योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाने करीत आहे.''

(२२)  '' कॅन्सर रुग्णांचे दिवसेंदिवस  वाढत चाललेले प्रमाण, कॅन्सर या दुर्धर व असाध्य रोगावर उपचार करण्याकरीता मोठया प्रमाणावर रुग्ण मुंबईतील टाटा मेनोरीयल रुग्णालयांत येत असणे, परिणामी या रुग्णालयावरील  वाढत असलेला ताण, हा ताण कमी करण्यासाठी व कॅन्सर रुग्णांवर वेळीच उपचार व्हावेत यादृष्टीने, मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयातील अतिरिक्त मोकळया जागी कर्करोग निदान व उपचार केंद्र स्थापन करण्यांत यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२५)  '' राज्यातील रुग्णांना भासणारी रक्ताची निकड आणि रक्तदानाचे महत्व विचारात घेवून सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान होणे गरजेचे आहे. यासाठी रक्त संक्रमण परिषदेने फक्त रक्तदान दिवस साजरा न करता त्यांना विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा व त्यासाठी विशेष समिती नेमून यांचे नियंत्रण करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

श्री.रामदास कदम यांचा ठराव क्रमांक  २६,२७,२८,२९,३०

(२६)  '' कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२७)  '' कोकणातील विशेषतः रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी कोयना धरणाचे पाणी व या दोन्ही जिल्हयात सर्वांत जास्त पाऊस कोकणात पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते कोकणातील वरकस जमिनीला पाणी पुरविण्याचे दृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.  ''

(२८)  '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९)  '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३०)  '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्याठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करणे, यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्प कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिष्ज्ञद शासनास करीत आहे. ''

श्री.दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक ३४,३५

(३४) '' मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीमधील न्यायाधिशांच्या वापरासाठी असलेल्या प्रवेश द्वारावर "बॉम्बे उच्च न्यायालय" असा नामफलक आहे, मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा असल्यामुळे या नाम फलकामध्ये "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा तातडीने बदल करावा, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३५) '' मुंबई शहरात रोज हजारोंच्या संख्येने येणारे परप्रांतीयांचे लोंढे, परिणामी मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडून मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या विविध समस्या लक्षात घेता मुंबई शहरात येणारे परप्रांतीयांचे लोंढे रोखण्यासाठी शासनाने तातडीने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री.हुसेन दलवाई यांचा ठराव क्रमांक ३६,३७,३८,३९,४०

(३६) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य होण्यासाठी सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मो-या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३७) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३८) '' कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३९) '' राज्यात शासकीय व राजकीय स्तरावरील सतत वाढणारा भ्रष्टाचार रोखण्यास सध्याची यंत्रणा कुचकामी ठरते आहे हे लक्षात घेता, केंद्रीय दक्षता आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात "राज्य दक्षता आयोगाची" स्थापना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४०) '' राज्यातील अनेक ठिकाणी विशेषत: कोकणात धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक ४१,४२,४३,४४

(४१) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला

भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४३) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्रीमती दिप्ती चवधरी यांचा ठराव क्रमांक ४५,४६,४७,४८,६९

(४५) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४६) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४७) ''जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४८) ''राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद व तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(६९)  ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

श्री.राजन तेली यांचा ठराव क्रमांक  ४९,५०,५१,५२,५३

(४९)  '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण  व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण  झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०)  '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु करुन १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१)  '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५२)  '' राज्यात विशेषतः ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी "शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करत आहे. ''

(५३)  '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री.संजय दत्त यांचा ठराव क्रमांक  ५६,५७,५८

(५६)  ''ठाणे जिल्हा हा राज्यात सर्वात मोठा असून हा दुर्गम, मोठ्या प्रमाणात आदिवासी व मागासलेला जिल्हा असून या जिल्ह्याचा विकास होण्याच्या दृष्टीने कल्याण-माळशेजघाट मार्गे अहमदनगर या नवीन रेल्वे मार्गाचे काम त्वरित मंजूर करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५७) ''राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अपघातग्रस्तांना वेळीच व योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाचीं वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५८) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्याठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करणे यासाठी या सर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिष्ज्ञद शासनास करीत आहे. ''

प्रा.सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक ६०,६१,६२

(६०) "राज्यातील ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी राजीव गाधी घरकुल योजना राबविण्यात येत असून या योजनेला बँकाँमार्फत योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने शासनाच्या या समाजोपयोगी योजनेला खीळ बसण्याची शक्यता विचारात न घेऊन ही योजना लाभार्थ्यांकडून एक पैसा न घेता १००% राज्य शासनामार्फत राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६१) "राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६२) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु करुन १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री.जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक ६४,६५,६६,६८

(६४) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६५) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य होण्यासाठी सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मो-या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६८) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री.सुभाष चव्हाण यांचा ठराव क्रमांक ७०,७१,७४

(७०) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७४) '' कोकणातील भुभागापैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, आईन, किंजळ, खैर इ.वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

श्री. विजय सावंत यांचा ठराव क्रमांक ७५,७६,७७,७८,७९

(७५) "कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे."

(७६) "राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकतील, या दृष्टीने एक कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७७) "भारताचे व वेंगुर्ल्याचे सुपुत्र डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांची चिरंतन स्मृती जपण्यासाठी चीनमध्ये एका रुग्णालयास त्यांचे नाव देण्यात आले आहे; मात्र भारतात त्यांचे कुठेही स्मारक नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता डॉ.कॉटणीसांचे हे जन्मशताब्दी वर्ष असल्याचे औचित्य साधून वेंगुर्ला (जिल्हा सिंधुदूर्ग) येथे "डॉ.कोटणीस स्मारक" उभारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७८) "कोकणातील सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्द पातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७९) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. परशुराम उपरकर यांचा ठराव क्रमांक ८०, ८१

(८०) मुंबई-गोवा महामार्ग क्र.१७ चार पदरी होण्याकरिता सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत दोन राज्य जोडणारा व पर्यटनदृष्टया महत्वाचा असणारा महामार्ग चारपदरी होण्यास विलंब होत असल्याने या महामार्गावर गेल्या दोन वर्षात मोठया प्रमाणावर झालेल्या अपघातात हजाराहून अधिक लोकांचे झालेले मृत्यू, अनेकजण जखमी होणे व कोटयावधी रुपयांचे वाहनांचे झालेले अपरिमित नुकसान, सदर अपघाताच्या घटना टाळण्यासाठी व या महामार्गाचे दोन राज्यांना जोडणारे व पर्यटनदृष्टया महत्व लक्षांत घेऊन हा महामार्ग चौपदरी करण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(८१) "इयत्ता १० वी, १२ वी करीता पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, मुंबई या ठिकाणी स्वतंत्र परिक्षा बोर्ड असून कोकणातील ठाणे,रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या चार जिल्हयांकरिता स्वतंत्र परीक्षा बोर्ड निर्माण करण्याची शासनाने वारंवार घोषणा करुनही स्वतंत्र परिक्षा बोर्ड स्थापन न झाल्याने, मुंबई सारख्या शहरी विभागाच्या बोर्डाला संलग्न राहिल्यामुळे या चार जिल्हयातील विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन कोकणाकरिता स्वतंत्र परिक्षा बोर्ड स्थापन करण्यात यावे, अशी ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ८३,८४,८६

(८३) "राज्यातील सर्व माध्यमाच्या (इंग्रजी वगळून) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून व महाविद्यालयामधून उच्च प्रतिचे व गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी त्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना व महाविद्यालयांना अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्विकारावे,

अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

(८४) "राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८६) "राज्यातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा तुलनात्मकदृष्टया मागासलेला असल्याने मराठवाडयाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले १) लातूर ते मिरज, २) पूर्णा ते अकोला, ३) रोटेगाव ते पुणतांबा,
४) परळी-बीड-नगर हे नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी नांदेड ते मनमाड रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करणे तसेच अपूर्ण असलेले रेल्वे मार्ग पूर्ण होण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री चंद्रकांत पाटील यांचा ठराव क्रमांक ८७,८८,८९,९०,९१

(८७) "महाराष्ट्र राज्याची व देशाची प्रगती साधण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग मोलाचा ठरणे, ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याची गरज निर्माण होणे, त्यांना ६० वर्षापासूनच ज्येष्ठ नागरिक हे ओळखपत्र देणे, त्याच्या आधारे संपूर्ण देशात त्या ओळखपत्राचा फायदा होणे, त्यांना मूलभूत सोयी - सुविधा उपलब्ध करणे, वृध्दावस्थेत होणाऱ्या आजारावर उपचार करण्यासाठी, शासनाच्या जिवनदायी योजनेत त्यांचा समावेश करणे, यादी मधील दवाखान्यांमध्ये मोफत उपचार करणे, त्यांना वेगवेगळया सवलती देणे, त्यांना पेन्शन योजना लागू करणे, त्यांची काळजी त्यांच्या मुलांनी सक्तीने घेण्यासाठी कायदा तयार करणे, लेक वाचवा अभियान व तंटा मुक्ती अभियांनाप्रमाणे ज्येष्ठ नागरिक अभियान सुरु करुन त्यांना दिलासा देणे या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८८) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(८९) "राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे"

(९०) "वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९१) "राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप यांचा ठराव क्रमांक ९२,९३,९४,९५,९६

(९२) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९३) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९४) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९५) "राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९६) "राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

श्री. राम पंडागळे , वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९७

९७) औरंगाबाद जिल्हयात अंजिठा व वेरुळ येथे गौतम बुध्दाच्या जगप्रसिध्द लेणी आहेत, गौतम बुध्दाच्या या लेणी पाहण्यास व त्यावर अभ्यासासाठी देशातील लाखो बौध्द बांधव व इतर लोक येत असतात, तसेच विदेशातील लाखो लोक या लेण्याचा अभ्यास करण्यासाठी व लेण्या पाहण्यासाठी येत असतात. जगाला शांततेचा मार्ग दाखविण्याऱ्या व जगभर बौध्द धर्माचा प्रसार व प्रचार करणाऱ्या या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी औरंगाबाद येथील चिकलठाणा विमानतळाला "तथागत गौतम बुध्द विमानतळ" असे नाव देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**सत्तावीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्र वितरीत करण्यात आली आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० मार्च, २०११.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.

# महाराष्ट्र विधानपरिषद
# प्रथम अधिवेशन, २०११
# कार्यावलीचे जोडपत्र क्रमांक (अशासकीय ठराव)

**श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८२**

"२५ ऑगस्ट,२००९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे २००९-२०१० पासून सन २०११-१२ पर्यंतच्या ३ वर्षांच्या कालावधीत संबंधित मंत्रालयीन विभागाने तीन टप्प्यात निधी वितरीत करण्याबाबतची अंमलबजावणी न केल्याने कोकणातील चारही जिल्ह्यांना रु.५२३२ कोटी रुपये इतका निधी वितरीत न झाल्याने अनेक प्रकल्प मार्गी न लागणे पाटबंधारे प्रकल्पांतर्गत गाळ काढण्याकरिता मशीन खरेदी, पर्यटन अशा विविध कामांकरीता निधी उपलब्ध होऊ न शकणे, परिणामी, कोकणाचा विकास खुंटला असून,या विकास कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने विशेष कृती कार्यक्रम राबवून त्यात आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे."

**डॉ. सुधीर तांबे , वि.प.स. यांचा ठराव. क्रमांक ९८,९९,१०० व १०१**

"राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

"राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

"खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १५ मार्च, २०११

**डॉ.अनंत कळसे,**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**प्रती :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती व मा.उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव.
३. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.